दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

प्रजासत्ताक दिनानिमित्त
'दै. आरंभ पर्व' कार्यालयाला
रविवार, दि. २६ जानेवारी २०२५
रोजी सुट्टी असल्याने सोमवार,
दि. २७ जानेवारी २०२५ रोजीचा
अंक प्रसिद्ध होणार नाही,
याची वाचक, जाहिरातदार,
हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

- संपादिका

● वर्ष : ०२ ● अंक : ०७३ ● पुणे ● रविवार, दि. २६ जानेवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



आज सर्वात मोठ्या ध्वजाचे ध्वजारोहण 3



पुण्याचे महापौरपद आरपीआयला मिळावे - आठवले 4

## सुनील फुलारी, सुनील तांबे आणि विवेक झेंडे

# राष्ट्रपती पोलिस पदकाचे मानकरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर झाले आहेत. विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदक अतिरिक्त पोलिस महासंचालक डॉ. रवींदर कुमार झिलेसिंग सिंघल, पोलिस महानिरीक्षक दत्तात्रेय राजाराम कराळे, पोलिस महानिरीक्षक सुनील बळीरामजी फुलारी, समादेशक रामचंद्र बाबू केंद्रे यांना जाहीर करण्यात आले आहे.



विशेष सेवेसाठी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील अतिरिक्त अधीक्षक विवेक झेंडे, कारागृह विभागातील उपअधीक्षक सुनील तांबे, सांगली जिल्हा कारागृहातील हवालदार अहमद शमसुद्दीन मनेर, तुळशीराम गोरवे, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील हवालदार गणेश गायकवाड, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयातील हवालदार प्रल्हाद कुदळे यांच्यासह राज्यातील ३९ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर करण्यात आले आहे.

कोल्हापूर परिक्षेत्रात पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होता. या पाच जिल्ह्यातील गंभीर गुन्हे,तसेच कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळण्याचे काम फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली चालते. कोल्हापूर,सातारा, मिरज, विशाळगड येथील जातीय तणाव, तसेच आरक्षणविषयक आंदोलनांचा बंदोबस्त फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली आखण्यात आला होता.

सामाजिक शांतता राखण्यासाठी सातत्याने बैठका, तसेच ग्रामस्थांशी संवाद ठेवल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली नाही. पोलिस सेवेत दाखल झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात गडचिरोली, चंद्रपूर या भागात त्यांनी काम केले. माओवादी क्षेत्रात त्यांनी केले.

नागपूर, जळगाव, सांगली, पुणे, नाशिक शहरात ते नियुक्तीस होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीवांची तस्करी करणाऱ्या टोळीला पकडण्यात आले होते. त्यांच्याकडून ४५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. पुणे शहरात सायबर गुन्हे शाखेत पोलिस उपायुक्त असताना फुलारी सायबर लॅबची स्थापना करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

उपअधीक्षक सुनील तांबे हे सध्या कारागृहातील दक्षता विभागात नियुक्तीस आहेत. मुळचे जुन्नर तालुक्यातील असलेले तांबे हे १९८९ मध्ये पोलिस उपनिरीक्षक म्हणून पोलिस दलात रुजू झाले होते. ३६ वर्षांच्या सेवेत त्यांना ४०० हून अधिक बक्षीसे मिळाली आहेत. दिवे आगर येथील गणेश मूर्तीच्या दागिने चोरीचा शोध लावल्याबद्दल तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या हस्ते १० लाख रुपयांचे बक्षीस त्यांच्या पथकाला मिळाले होते. पुणे-सोलापूर महामार्गावर कुरकुंभ मेफेड्रोन प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने केला होता. गुन्हे शाखेत सहायक आयुक्तपदी नियुक्तीस असताना तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत छापा टाकून तीन हजार ६०० कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त केले होते. तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांच्या कारवाईचे कौतुक करून २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तांबे हे २०१५ मध्ये राज्य दहशतवादी विरोधी पथकात (एटीएस पुणे) नियुक्तीस होते. फरार असलेला माओवादी अरुण भेलके आणि त्याच्या साथीदारांनी एटीएस पथकाने अटक केली होती. छत्रपती संभाजीनगर एटीएस पथकात नियुक्तीस असताना त्यांनी बंदी घातलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या १७ जणांना अटक केली होती. कल्याणीनगर अपघात प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेतील तत्कालीन सहायक आयुक्त म्हणून तांबे आणि पथकाने केला होता. सातारा, पुणे ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर, पुणे शहर आणि मुंबईत तांबे नियुक्तीस होते.

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातील अतिरिक्त अधीक्षक विवेक झेंडे, कारागृह विभागातील उपअधीक्षक सुनील तांबे, सांगली जिल्हा कारागृहातील हवालदार अहमद शमसुद्दीन मनेर, तुळशीराम गोरवे, येरवडा मध्यवर्ती कारागृहातील हवालदार गणेश गायकवाड, दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयातील हवालदार प्रल्हाद कुदळे गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर करण्यात आले आहे.

### रामचंद्र केंडे यांना राष्ट्रपती पोलिस पदक

दौंड - पुणे जिल्ह्यातील नानवीज (ता. दौंड) येथील राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा पोलिस अधीक्षक रामचंद्र केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर झाले आहे. शिपाई पदापासून पोलिस सेवेस सुरवात करीत परिश्रमाने ते पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. प्राचार्य रामचंद्र केंडे हे आंबवली (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील असून त्यांचे वडील बाबू केंडे हे दौंड शहरातील राज्य राखीव पोलिस दलात आचारी या पदावर नोकरीस होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण दौंड येथील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयात व उच्च माध्यमिक शिक्षण दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेले आहे. रामचंद्र केंडे हे २६ जून १९८५ रोजी दौंड शहरातील राज्य राखीव पोलिस दलाच्या गट क्रमांक पाच मध्ये पोलिस शिपाई म्हणून भरती झाले होते. त्यांनी राज्य राखीव पोलिस दलाच्या पुणे, दौंड, कोल्हापूर, सोलापूर येथील गटांमध्ये आणि तुरची (जि. सांगली) येथील पोलिस प्रशिक्षण केंद्रात सेवा बजावली आहे. २००९ मधील पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह तर २०११ मधील गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलिस पदकाचे ते मानकरी आहेत.नानवीज येथील राज्य राखीव पोलिस प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना सेंद्रिय आहार देणे, शारिरिक तंदुरूस्तीसाठी विविध उपक्रम, कवायतींच्या आधुनिक प्रकारांचा समावेश, आदी विविध उपक्रम श्री. केंडे यांनी राबविले आहेत. प्रशिक्षण केंद्राच्या पाइप बॅण्ड पथकाने महाराष्ट्र राज्य पोलिस पाइप बॅण्ड संघ म्हणून अखिल भारतीय पोलिस बॅण्ड स्पर्धेत तब्बल सहा वेळा विजेतेपद पटकावले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर रामचंद्र केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपतींचे पोलिस पदक जाहीर झाले आहे.





### नवीन रुग्णांची वाढ नाही; 'जीबीएस'चा आकडा ७३ वर, १४ व्हेंटिलेटरवर

**पुणे (दै. आरंभ पर्व) :** पुणे - पुणे-पिंपरी चिंचवड शहरासह जिल्ह्यातील 'गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) रुग्णांच्या संख्येत शनिवारी वाढ झाली नाही. रुग्णसंख्या 73 वर स्थिर आहे. तर 14 रुग्ण कृत्रिम श्वासोच्छवास (व्हेंटिलेटर) यंत्रणेवर आहेत. दरम्यान, शनिवारी 9 संशयित रुग्ण आढळले आहेत. दरम्यान पुण्यात अजून यामुळे मृत्यूची नोंद झालेली नाही. जीबीएस आढळलेल्या 23 रुग्णांचे रक्ताचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे (एनआयव्ही) तपासणीसाठी पाठवले होते. त्यांचे अहवाल प्राप्त झाले असून सर्व नमुन्यांमध्ये झिका, डेंगी, चिकुनगुनिया चे विषाणू आढळलेले नाहीत. याआधी 11 जणांचे शौच नमुने तपासणीसाठी 'एनआयव्ही' कडे पाठवले होते. त्यांचे अहवाल आले असून त्यापैकी 9 नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस आढळला. हेच 11 नमुने पुढे जीवाणूंच्या (बॅक्टेरिया) तपासणीसाठी पाठवले असता त्यापैकी 3 शौच नमुन्यांमध्ये 'कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी चे जीवाणू आढळले तर पाच मध्ये काही सापडले नाही.









# अमित शहांवर टीका करता, पात्रता तरी आहे का?

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मदिनानिमित्त उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा सेनेचा मेळावा मुंबईतील अंधेरी क्रीडा संकुलात पार पडला व त्याचवेळी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा शिवोत्सव बीकेसीच्या मैदानावर संपन्न झाला. उद्धव ठाकरे यांच्या मेळाव्यात उद्धट, मग्रुरीची आणि दादागिरीची भाषा ऐकायला मिळाली, तर एकनाथ शिंदे यांच्या मेळाव्यात संयम, नम्रता व कार्यकर्त्यांना मानसन्मान बघायला मिळाला. ठाकरे व शिंदे दोघेही माजी मुख्यमंत्री आहेत. दोघांनाही मुख्यमंत्रीपदावर काम करण्याची प्रत्येकी अडीच वर्षे संधी मिळाली. एकाने घरी बसून राज्य कारभार केला, तर दुसरा राज्यभर अहोरात्र पायाला भिंगरी बांधल्यासारखा फिरत होता. उद्धव यांनी २०१९ मध्ये भाजपाशी संबंध तोडले व काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने मुख्यमंत्रीपद पदरात पाडून घेतले, तर भाजपाच्या मदतीने व मोदी-शहांच्या आशीर्वादाने शिंदे यांना राज्याचे मुख्यंत्रीपद मिळाले व आता उपमुख्यमंत्रीपदावर ते काम करीत आहेत. शिंदे यांनी ठाकरेंच्या विरोधात उठाव केला तेव्हा त्यांच्यासमवेत पक्षाचे ४० आमदार बाहेर पडले, तर नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे ६० आमदार जनतेने निवडून दिले.

शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने ८० जागा लढवल्या व ६० जिंकून दाखवल्या, यावरून शिवसेना म्हणून राज्यातील जनतेने त्यांना व त्यांच्या पक्षाला संमती दिली आहे हे स्पष्ट झाले. म्हणूनच शिंदे यांनी शिवसेनेचा विजयोत्सव बीकेसी मैदानावर साजरा केला. भाजपाशी संबंध तोडल्यापासून ठाकरे यांना काही काळ मुख्यमंत्रीपदाच्या मखरात जरूर बसायला मिळाले. पण त्यांच्या विश्वासार्हतेला तडा गेला. कडवट हिंदुत्वाची कास सोडून ते काँग्रेसच्या नादी लागले. त्यांना मुंबईतील मुस्लीम मतदारांचा पाठिंबा जरूर मिळाला कारण ठाकरे यांनी मोदींच्या विरोधात राजकारण सुरू केले म्हणूनच हे शक्य झाले. लोकसभा निवडणुकीत ठाकरे यांच्या पक्षाचे सात ते आठ खासदार निवडून आले तेव्हापासून विधानसभा आपण जिंकलीच असे त्यांना वाटू लागले. आपणच महाघाडीचे पुन्हा मुख्यमंत्री होणार म्हणून ते मुंडावळ्या बांधून बसले. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील मतदारांनी त्यांच्या पक्षाला घरी बसवले. ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली उबाठा सेनेने राज्यात ९७ जागा लढवल्या पण जेमतेम २० आमदार निवडून आले. त्यातही घरातले दोघे आहेत. पक्षाची एवढी दाणादाण झाली असतानाही उसने अवसान आणून त्यांनी अंधेरीच्या क्रीडा संकुलात जे भाषण केले त्यामुळे त्यांचेच अधिक नुकसान होणार आहे. पराभव का झाला याचे विवेचन करण्यात त्यांना रस नाही. आपण कुठे कमी पडलो याची कारणे त्यांना शोधावीशी वाटत नाहीत. केवळ मोदी-शहा आणि एकनाथ शिंदेंवर वाटेल तशी बेलगाम टीका-टीप्पणी करून उबाठा सेनेची व्होट बँक वाढणार कशी? उद्धव ठाकरे यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागल्यापासून ते एकनाथ शिंदे व त्यांच्या सहकारी आमदारांचा सातत्याने गद्दार म्हणून उल्लेख करीत आहेत. ते जर गद्दार असतील तर विधानसभा निवडणुकीत जनतेने त्यांना पुन्हा का निवडून दिले? उलट शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे ६० आमदार निवडून आले हाच उद्धव व त्यांच्या पक्षाचा मोठा पराभव आहे.



सत्ता गेल्यापासून उद्धव हे अमित शहा व एकनाथ शिंदे यांच्यावर सतत दगाबाजीचे आरोप करीत आहेत. शहा व शिंदे यांचा ते सतत द्वेष करीत आहेत. निवडणूक काळात तर देवेंद्र फडणवीस यांच्यावर ते सतत हल्लाबोल करीत होते, एकदा तर तू राहशील किंवा मी राहीन अशी धमकीही त्यांनी जाहीरपणे दिली. मतदारांनी त्याचे उत्तर मतपेटीतून दिल्यानंतरही उद्धव यांचे डोळे उघडलेले नाहीत. ते आपल्या व आपल्या पक्षाच्या भविष्याचा खड्डा स्वत:च खणत आहेत असे त्यांच्या भाषणावरून दिसून येते. उबाठा सेना संपवायला आता भाजपा किंवा शिंदे यांच्या शिवसेनेला फार काही करावे लागणार नाही, कारण ते काम स्वत: उद्धव व त्यांचे रोज सकाळी असबंद्ध बडबड करणारे प्रवक्ते करीत आहेत. नागपूरच्या विधिमंडळाच्या अधिवेशनात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ दिला, या प्रसंगाला मोठी प्रसिद्धी मिळाली. पण त्यानंतर उद्धव यांची खदखद किंवा धमक्या देणारी भाषणे थांबली नाहीत. महापालिका निवडणुका येत आहेत, मला सूड... सूड... सूड... होय मला सूड हवाय असे ते अंधेरीच्या क्रीडा संकुलात आपल्या भाषणात बोलले. याचा अर्थ काय होतो? ते मुख्यमंत्री असतानाही त्यांनी तत्कालीन केंद्रीयमंत्री नारायण राणे यांना अटक करण्यासाठी पोलिसांच्या फौजा पाठवल्या होत्या, ते सुडाचेच राजकारण होते. राणे यांना अटक करण्यासाठी ते व त्यांच्या 'कोटरीतील' नेते कसे उतावीळ झाले होते हे सर्व महाराष्ट्राने पाहिले आहे.

सत्ता गेल्यावरही आणि विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही सुडाची भाषा ठाकरे बोलत आहेत, याचा अर्थ त्यांचा तोल सुटला आहे. त्यांना वास्तवतेचे भान राहिलेले नाही, असेच म्हणावे लागेल. जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा काय करतो हे भविष्यात दिसेल, जेवढे अंगावर याल तेवढे वळ घेऊन दिल्लीला परत जाल, असा इशारा त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना दिला. देशाच्या गृहमंत्र्यांना दिलेली धमकी हे असभ्य व उद्धटपणाचे लक्षण तर आहेच पण राजकारणातल्या मर्यादा ठाकरे यांनी ओलांडल्या आहेत. जिथे आम्ही औरंगजेबाला गाडले तिथे अमित शहा किस झाड की पत्ती असे म्हणायला ठाकरे यांना काहीच कशी लाज वाटली नाही? आपण महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास गमावला आहे हे मान्य करायला ठाकरे तयार नाहीत, त्यांना अजूनही खुमखुमी असेल येत्या महापालिका व स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत त्यांना जनता जबर धडा शिकवेल.

# स्व. दत्ताभाऊ भुरुक सभागृह हस्तांतरित करण्याचा घाट

## नागरीकांना कल्पना न देता महानगरपालिकेच्या हालचाली

**कोथरूड (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक 31 मौजे कर्वेनगर मावळ्याळी कामना वसाहत बौद्ध विहार हा परिसर आर्थिक दृष्ट्या दुर्बल वस्ती म्हणून पाहिला जातो. या भागामध्ये अनेक नागरिक हे छोटे कार्यक्रम करण्यासाठी दत्ताभाऊ गोरख सभागृह याचा वापर करीत असतात. अलीकडे महानगरपालिकेमार्फत या सभागृहाचीचे काम सुरू करण्यात आले असता संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी तोंडी सांगितले होते की वरील पत्रे हे मोठ्या प्रमाणात गळत असून पत्रे बदलण्याचे आणि डागडुजीचे काम सुरू केले आहे. लवकरच हे पूर्ण करून या ठिकाणी कार्यक्रम घेणे सोयीचे होईल. परंतु आज सहाय्यक आयुक्त राऊत साहेब वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय यांच्यासोबत चर्चा केली असता यांच्यामार्फत सदर ठिकाणी आरोग्यवर्धिनी साठी सभागृह देण्यात येणार असल्याचे समजले असून त्यामुळे या ठिकाणी डागडुजी सुरू आहे असे सांगितले.




तरी मावळे आळी, कामना वसाहत, बौद्ध वस्ती या भागातील नागरिकांना छोटेखानी कार्यक्रमांसाठी हा सभागृह उपलब्ध असावा यासाठी या भागातील नागरिक एकत्र येऊन या आरोग्यवर्धिनी उपक्रमाची नियोजित केलेली जागा ही तत्काळ स्थलांतरित करावी अशी परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत.

# महानगरपालिका निवडणूक व्हायला हवीच!

## बाप्पूसाहेब पोकळे : सरचिटणीस खडकवासला भाजपा

*गेल्या अनेक वर्षापासून खोळंबलेल्या महानगरपालिका निवडणूकामुळे प्रशासकीय कामे होत नसल्यामुळे सर्वत्र नाराजीचा सुर उमटत आहे.महानगरपालिका निवडणुका संबंधी सुप्रीम कोर्टाच्या सुनावणीची तारीख पे तारीख सुरूच आहे. दै. 'आरंभ पर्व'ने शहरातील अनेक भागातील प्रभागांचा आढावा घ्यायला सुरुवात केली आहे. निवडणुका का व्हायला हव्यात याविषयी नागरिक, सर्वपक्षीय नेते तसेच महापालिका अधिकारी यांची मते जाणून घेतली आहेत. एकंदरीत सर्वांचा सूर निवडणुका व्हायला हव्यात असाच आहे.*

*- लक्ष्मण साबळे, पुणे (८६०५२८४२७२)*





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या अनेक वर्षापासून अधिक काळ महानगरपालिका निवडणुका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्या नाहीत . परंतु या निवडणुका पाहिजे कारण की स्थानिक लोकांचे खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न आहेत ते प्रश्न आता प्रशासन असताना लवकरात लवकर सुटले जात नाही. समस्या जैसे तेच राहतात. जास्तीत जास्त फॉलोअप घेतला तरीही प्रशान जेवढे पाहिजेल तेवढे काम करत नाही .त्यामुळे लोकांच्या समस्या आहे तसेच राहतात.


नवीन समाविष्ट गावांमध्ये प्रशासन यंत्रणा कमी पडत आहे. प्रत्येक विभागाला पाहिजे तेवढे मनुष्यबळ पाहिजेल तेवढे नाही. त्यामुळे अनेक कामही पेंडिंग राहिले जातात. लवकर काम होत नाही समाविष्ट गावांसाठी डीपी फायनल नाही डीपीआर फायनल नाही तरी लवकरात लवकर महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झाल्यानंतर त्या त्या प्रभागाला प्रतिनिधी आल्यानंतर खूप मोठ्या प्रमाणात कामे होतील. प्रभागातीळ परिसरातील कामे ही अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देण्यास लोक प्रतिनिधीद्वारे मदत होईल तर ही कामे लवकरात लवकर मार्गी लागतील.

धायरी व परिसरात ड्रेनेज लाईनची कामे व्हायला हवी. अनेक भागामध्ये मुबलक पाणी नाही. अनेक भागांमध्ये पाईपलाईनची कामे विकसित झाली नाही. शिवाय अनेक भागातील पावसाळी लाईनही उपलब्ध नाहीत. अनेक भागामध्ये रोड, पाण्याचा खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न आहे. धायरी व परिसरातील लहान मुलांसाठी ज्येष्ठांसाठी नाना नानी पार्क, गार्डन, प्लेग्राउंड एरिया, बस स्थानक, पोलीस चौकी, ह्या सुविधा मिळवण्यासाठी पुणे महानगरपालिकेची निवडणूक होणे गरजेचे आहे. या भागातील गाजणाऱ्या ट्रॅफिक समस्या सुटल्या पाहिजे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आ. भीमराव तापकीर यांच्या निधीतून ही धायरी परिसरामध्ये विकास कामे झाले आहेत. मात्र महानगरपालिकेच्या अंतर्गत निधीतूनही विकास कामे झाल्यास प्रभागाचा विकास होण्यास नक्कीच मदत होईल.

# शरद पवार यांचे पुढील चार दिवसांची सर्व सार्वजनिक कार्यक्रम रद्द

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांच्या पुढील चार दिवसांतील सर्व नियोजित सार्वजनिक कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. पवार यांना खोकल्यामुळे बोलण्यात त्रास होत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. ८४ वर्षीय शरद पवार यांनी गुरुवारी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथे एका कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती. मात्र, त्या भाषणादरम्यान त्यांना वारंवार खोकल्याचा त्रास होत असल्याचे दिसून आले. तब्बल १८ मिनिटांच्या भाषणादरम्यान पवार यांची प्रकृती अस्वस्थ असल्याचे प्रकर्षाने जाणवले. "खोकल्यामुळे बोलण्यात अडचण होत असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पवार साहेबांनी चार दिवस सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे," असे जगताप यांनी स्पष्ट केले. शरद पवार हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ आणि प्रभावशाली नेत्यांपैकी एक आहेत. त्यांची प्रकृती ठीक व्हावी, यासाठी त्यांच्या समर्थकांकडून प्रार्थना केल्या जात आहेत. पवार यांच्यावर लवकरात लवकर उपचार करून त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला गेला आहे, असेही पक्षाच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, पवार यांच्या आगामी सार्वजनिक कार्यक्रमांसाठी नव्याने नियोजन करण्यात येईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.



# विश्व मराठी संमेलनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे (आरंभ पर्व) : पुण्यात होणाऱ्या विश्व मराठी संमेललाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत बालगंधर्व रंगमंदिर ते फर्ग्युसन महाविद्यालय, अशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या संमेलनात ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना 'साहित्य भुषण पुरस्कार' प्रदान केला जाईल. तर, रितेश देशमुख यांना कलारत्न पुरस्काराने सांगता समारंभात सन्मानित केले जाईल, अशी माहिती मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.**

# संविधानाने आपल्याला काय दिले?

**(दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व संविधान सभेच्या दोन वर्ष अकरा महीने अठरा दिवसाच्या अथक प्रयत्नातून भारतीय संविधान निर्माण झाले. संविधानाने आपल्याला सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व दिले.

सनातनी धर्मव्यवस्थेने कष्टकरी, स्त्रिया, श्रमकरी, शेतकरी वर्गाचे नाकारलेले अधिकार संविधानाने दिले. भारतीय संविधानातील कलम एकने आपल्या देशाचे नाव निश्चित केले. ते म्हणजे भारत तथा इंडिया, म्हणजे आपला देश कोणत्याही एका विशिष्ट घराण्याचा, जातीचा, धर्माचा नाही, तर तो सर्व भारतीयांचा देश आहे. आपला देश हा कोणत्याही एका विशिष्ट धर्माचा अनुनय करणार नाही किंवा कोणत्याही धर्माच्या विरोधात राहणार नाही, म्हणजेच धर्मनिरपेक्षता आपल्या संविधानाचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय संविधानाने समता दिली. जात, धर्म, वंश, लिंग,प्रांत,भाषा आणि जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव करता येणार नाही, याची हमी भारतीय संविधानाने कलम १४,१५,१६ ने दिलेली आहे. कलम १४ अंतर्गत कायद्यासमोर सर्वांची समानता. संविधानाने कायद्याचे अधिराज्य स्थापून दिले असून कायद्याच्या चौकटीतच राज्य कारभार करणे, राज्यकर्त्यांना बंधनकारक आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांच्या मनमानी, बेकायदेशीर कार्याला आळा बसतो.



तसेच कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका स्वतंत्र असल्याने राज्यकर्त्यांच्या मनमानी कारभारास चाप बसतो. कोणत्याही स्वरूपाची अस्पृश्यता पाळता येणार नाही,याची तरतूद संविधानाने कलम १७ नुसार केलेली आहे. प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. आपले विचार वेगवेगळ्या माध्यमातून व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने कलम १९ नुसार दिलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये संशोधन, लेखन आणि प्रबोधन करणाऱ्या अनेक महापुरुषांचा छळ झाला, त्यांच्या हत्या झाल्या, त्यामुळे असंख्य सृजनशील पूर्वजांना व्यक्त होता आले नाही. व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधान देते. आपल्याला कोणताही वैध व्यवसाय करण्याचे, देशांतर्गत संचार करण्याचे, देशांतर्गत स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधान देते. एखाद्या गुन्हेगारांवरील आरोप सिद्ध होईपर्यंत त्याला जामीन मिळवण्याचा अधिकार संविधान देते. जीविताचा अधिकार म्हणजे जगण्याचा अधिकार भारतीय संविधानाने कलम २१ नुसार दिलेला आहे. ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक भारतीय मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार याच कलमाअंतर्गत संविधान देते. शासन-पोलीस यंत्रणा जर एखाद्या असहाय्य व्यक्तीवर अन्याय करत असेल, तर न्यायालयात रिट दाखल करून न्याय मागता येतो. जय भीम चित्रपटात तपासादरम्यान पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू पावलेल्या आरोपीला जेंव्हा फरार घोषित केले तेंव्हा ऍड. चंद्रु हेबिअस कॉर्पसची (where is body) रिट दाखल करून त्याच्या पत्नीला न्याय मिळवून देतात, हा अधिकार संविधानातील कलम ३२ नुसार दिलेला आहे. या कलमाद्वारे थेट सर्वोच्च न्यायालयात पाच प्रकारच्या रिट दाखल करता येते. हा मूलभूत अधिकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलम ३२ ला संविधानाचा आत्मा म्हणतात.( Article ३२ is heart of Indian constitution). तर कलम २२६ नुसार उच्च न्यायालयात रिट दाखल करता येते. भारतीय संविधानाने वेठबिगारी, बालमजुरी संपुष्टात आणली. कोणत्याही स्त्री-पुरुषांची किंवा लहान मुलांची खरेदी विक्री करता येणार नाही, तसेच कोणत्याही लहान मुलांना कामगार म्हणून ठेवता येणार नाही, याची तरतूद भारतीय संविधानाने कलम २३, २४ नुसार केलेली केली. म्हणजे संविधानाने गुलामगिरी नष्ट केली. आपापल्या धर्मानुसार धार्मिक आचरण करण्याचा अधिकार भारतीय संविधानाने कलम २५ नुसार दिलेला आहे. अल्पसंख्यांक, आदिवासी, अनुसूचित जाती, शेतकरी, महिला यांच्या विकासाची तरतूद संविधानाने केलेली आहे.सर्व जातिधर्मातील महिला आज सर्व क्षेत्रात आहेत,हे संविधानाने शक्य झाले. कलम १५, २१, ३९,५१ इत्यादी कलमानुसार महिलांचा आदर, सन्मान आणि हक्काबाबतची तरतूद आहे. संविधानाने ज्याप्रमाणे आपल्याला हक्क अधिकार दिले, तशीच आपल्याला जबाबदारीदेखील दिलेली आहे. संविधानाचा, राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा आदर करणे. वैभवशाली वारशाचा अभिमान बाळगणे, संमिश्र संस्कृतीचा आदर करणे. आपल्या देशाची संस्कृती एकप्रवाही नाही, आपल्या देशात वारकरी, नाथ, शाक्त, शैव, वैष्णव, महानुभव, लिंगायत, सुफी, हिंदू,जैन, बौद्ध, शीख, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी इत्यादी धर्म-संप्रदाय आहेत. चिकित्सेचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून त्या सर्वांचा आदर बाळगणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे, असे संविधान कलम ५१ मध्ये सांगते. महिलांचा आदर करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे, इत्यादी कर्तव्य संविधानाने सांगितलेली आहेत. संविधानाने आपल्याला मतदान करण्याचा, नेता निवडण्याचा, नेतृत्व करण्याचा अधिकार दिला. एखाद्या उद्योगपतीचे, नेत्यांचे आणि झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरिकाच्या मताचे मूल्य एकच आहे. कोणत्याही भारतीय नागरिकाला स्थानिक स्वराज्य संस्था, विधिमंडळ, लोकसभा यामध्ये नेतृत्व करता येते. उपेक्षित वर्गाला राजकीय, शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रतिनिधित्व मिळावे, याची तरतूद संविधानाने केलेली आहे, यालाच आपण आरक्षण म्हणतो. भारतीय संविधानातील कलम ३४०, ३४१, आणि ३४२ या कलमानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर मागासवर्गीयांना भारतीय संविधानाने आरक्षण दिलेले आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, भौगोलिक विविधता असणाऱ्या देशाला एकत्र बांधून ठेवण्याचे कार्य भारतीय संविधानाने केलेले आहे. आपण ज्या पर्यावरणामध्ये राहतो, त्या पर्यावरणाचे रक्षण झाले पाहिजे, कारण पर्यावरणाचे रक्षण झाले तरच मानवाचे अस्तित्व टिकणार आहे. पर्यावरणाच्या रक्षणाच्या जबाबदारीची तरतूद देखील संविधानातील कलम ४८ कलम ५१ आणि कलम २१ नुसार करण्यात आलेली आहे. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. हे जितके कर्तव्यकठोर आहे तितकेच लवचिक आहे. मूळ चौकटीत बदल न करता घटनादुरुस्ती करण्याची तरतूद संविधानात आहे. लोकोपयोगी अनेकवेळा घटनादुरुस्ती झालेल्या आहेत. संविधानाचा आदर करणे, संविधानाचे संवर्धन करणे आणि संविधानाचे रक्षण करणे हे आपल्या प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा लोककल्याणकारी संविधाची अंमलजावणी २६ जानेवारी १९५० पासून झाली. यालाच प्रजासत्ताक दिन म्हणतात. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान देशाला सादर केले. हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. प्रजासत्ताक दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

- डॉ. श्रीमंत कोकाटे

# मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड लाँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील प्रतिष्ठित फंड घराण्यांपैकी एक असलेल्या, एलआयसी म्युच्युअल फंडाने, एलआयसी एमएफ मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड प्रस्तुत केला आहे. ही एक गुंतवणुकीस कायम खुली (ओपन-एंडेड) असणारी योजना असून, जी समभाग (इक्विटी), रोखे (डेट) आणि सोन्यांत गुंतवणूक करेल.



नवीन फंड प्रस्तुती (एनएफओ) २४ जानेवारी २०२५ रोजी सुरू होईल आणि ७ फेब्रुवारी २०२५ रोजी ती बंद होईल. या योजनेचे गुंतवणूक उद्दिष्ट समभाग आणि समभागांशी संलग्न साधनांच्या विविध पोर्टफोलिओमध्ये, रोखे आणि मनी मार्केट साधनांमध्ये तसेच गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंडाच्या (गोल्ड ईटीएफ) युनिट्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवलवृद्धी करण्याचे आहे.

या योजनेचा मानदंड हा ६५ टक्के निफ्टी ५०० टीआरआय + २५ टक्के निफ्टी कंपोझिट डेट इंडेक्स + देशांतर्गत सोन्याची १० टक्के किंमत यांचे संयोजन असा आहे. श्री. निखिल रुंगटा, श्री. सुमित भटनागर आणि श्री. प्रतीक श्रॉफ हे योजनेचे निधी व्यवस्थापक असतील. ही योजना १८ फेब्रुवारी २०२५ रोजी निरंतर विक्री आणि पुनर्खरेदीसाठी पुन्हा खुली होईल.

नवीन योजनेवर भाष्य करताना, एलआयसी म्युच्युअल फंड ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आर.के. झा म्हणाले: "मल्टी-ॲसेट ॲलोकेशन फंड हे आजकाल अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. कारण ते एकाच मालमत्तेतील केंद्रीकरणाची जोखीम कमी करतात आणि गुंतवणुकीत चांगले वैविध्य राहिल हे पाहतात. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया (ॲम्फी) ने प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये हायब्रिड म्युच्युअल फंडांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) २७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.



## मनमोहक फुलांची छबी

एम्प्रेस गार्डनमध्ये भरविण्यात आलेल्या पुष्प प्रदर्शनातील आकर्षक व मोहक फुलांचे ताटवे पाहण्यात लहान-थोर मंडळी गढून गेल्याचे दिसून येत होते. मनमोहक फुलांची छबी आपल्या मोबाईलमध्ये लहान, वृद्ध, युवक युवती वर्ग टिपताना दिसत होतेच, त्यासोबत आकर्षक वेगवेगळ्या फुल्यांच्या संधिध्यात सेल्फी घेण्याचा मोह सगळ्यांनाच अनावर होताना दिसत होते. सेल्फी साठी पुष्प प्रदर्शनातील प्रत्येक ठिकाणी लाईन लागली होती.

## थोडक्यात



### संविधान सन्मान दौड 2025 ला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय संविधान दिन अमृत महोत्सवी वर्षा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था ( BARTI), संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटीक्स असोसिएशन, संविधान फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित 'संविधान सन्मान दौड 2025' या मिनी मॅरेथॉन मध्ये आठ हजार पुणेकरांसह 40 देशातील विद्यार्थ्यांनी सहभागी होत या स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खाशाबा जाधव क्रीडा संकुल येथे स्पर्धेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे , मुख्य आयोजक परशुराम वाडेकर, डॉ. विजय खरे, शैलेश भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन करण्यात आले. तर स्पर्धेतील विजेत्यांना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, रिपाइंचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, रजिस्टार ज्योती भाकरे, बार्टी च्या निबंधक इंदिरा अस्वार, पुण्याच्या माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, मॅरथॉन संघटनेचे ॲड. अभय छाजेड, राहुल डंबाळे, दीपक म्हस्के, श्याम गायकवाड, संतोष मदने आदी मान्यवर उपस्थित होते.



### शहाजी साबळे यांचे दुःखद निधन

पुणे (आरंभ पर्व) : मुळचे सारोळे ता बार्शी येथील , सध्या सुप्पर बिबवेवाडी पुणे येथील रहिवासी बु. शहाजी बाबू साबळे यांचे दि.23 गुरुवारी सकाळी राहत्या घरी दुःखद निधन झाले. ते 68 वर्षांचे होते. ह्या भागातील सामाजिक कार्यकर्ते ,बापू व गोकुळ साबळे यांचे ते वडील होते. त्यांच्यावर संध्याकाळी सात वाजता स्व हरिभाऊ पोकळे स्मशानभूमी बिबवेवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, तीन मुले,दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे. बुद्धवासी. शहाजी साबळे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी नातेवाईक व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. यावेळी पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक बाळा ओसवाल, वंचित बहुजन आघाडीचे पर्वती विधानसभा अध्यक्ष रवींद्र गायकवाड, यांच्या सह सर्व क्षेत्रातील मान्यवर मंडळीही यावेळी उपस्थित होते.

### पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांच्या आगमनाची भव्य पर्वणी

पुणे (आरंभ पर्व) : आध्यात्मिक आर्षद्रष्टा, जागतिक मानवतावादी,आणि श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपूरचे संस्थापक पूज्य गुरुदेवश्री राकेशजींच्या पावन उपस्थितीची संधी लवकरच पुणे शहर मिळणार. गुरुवार, ३० जानेवारी २०२५ पासून शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत, या तीन दिवसांत, संध्याकाळी ८:०० ते १०:०० वाजेपर्यंत, गणेश कला क्रीडा मंच येथे पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांचे प्रेरणादायी आध्यात्मिक प्रवचनचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील साधक या अनोख्या संधीची आतुरतेने वाट पाहत आहेत, जिथे ते रोजच्या धकाधकीतून सुटका करून मनाला शांतता देऊ शकतील, जीवनाचा नवीन दृष्टिकोन विकसित करू शकतील आणि वैयक्तिक तसेच आध्यात्मिक प्रगतीचा प्रवास सुरू करू शकतील. सनातन आध्यात्मिक तत्वज्ञान सुलभतेने मांडण्याची आणि जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची विलक्षण क्षमता असलेल्या पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांचे उपदेश भौगोलिक व सांस्कृतिक सीमा ओलांडून प्रत्येकाला सत्य आणि जीवनाचा उद्देश शोधण्यासाठी प्रेरित करतात. पूज्य गुरुदेवश्री राकेशजी आपल्या धर्मयात्रांद्वारे जगभरातील साधकांना प्रेरणा देतात, त्यांना आपल्या शहरातच आंतरिक शांती, नि:स्वार्थता आणि जीवनाच्या उद्देशाचा नवा दृष्टिकोन अनुभवण्याची संधी प्रदान करतात. आगामी पुणे धर्मयात्रा हाच एक प्रयत्न असून साधकांना आध्यात्मिक सत्य आणि परिवर्तनाच्या साराशी जोडणारा एक अनुभव आहे. पूज्य गुरुदेवश्री राकेशजी हे एक आत्मज्ञानी गुरू, आध्यात्मिक द्रष्टा, आणि श्रीमद् राजचंद्रजींचे परम भक्त आहेत. ते श्रीमद् राजचंद्र मिशन धरमपूरचे संस्थापक आहेत ज्याची जगभरातील 206 केंद्रे, 96 यूथ ग्रुप आणि 250+ बाल मूल्य शिक्षण केंद्र आहे. ज्ञानवर्धक प्रवचने आणि ध्यानधारणेतून त्यांनी असंख्य जीवन उजागर केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, श्रीमद् राजचंद्र लव्ह अँड केअर प्रोग्राम, UN ECOSOC सह विशेष सल्लागार दर्जा असलेल्या दहापट उपक्रमाने जगभरातील वंचित समुदायांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले आहे.

# पुण्यात भव्य बिगर हुंडा सामूहिक विवाह सोहळा होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अग्रसेन भगवान चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दि. 15 मार्च २०२५ रोजी बिगर हुंडा सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील सुप्रसिद्ध उद्योगपति रतनलाल हुकुमचंद गोयल यांच्या 71 व्या वाढदिवसानिमित्ताने आयोजित हा बिगर हुंडा सामूहिक विवाह सोहळा हिंदू धर्मातील रितीरिवाज आणि धार्मिक परंपरांनुसार भव्य पद्धतीने करण्यात येणार आहे. या सोहळ्यात विवाह करणाऱ्या जोडप्यांना लाखो रुपयांच्या संसारोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. गरीब व गरजू उपवर-वधूंनी लवकरात लवकर आपली निःशुल्क नावनोंदणी करावी, असे आवाहन रतनलाल गोयल आणि राजेश अग्रवाल यांच्या वतीने करण्यात आले आहे. या सोहळ्यासंदर्भात माहिती देताना रतनलाल गोयल व राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, अग्रवाल समाजाचे कुलदेवता अग्रसेन भगवान यांनीच गरीब व गरजू लोकांना मदत करण्याचा संदेश आपल्या सर्व समाजबांधवांना दिला होता. अग्रसेन भगवान यांच्या याच संदेशाचा सम्मान करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असून, आजवर शेकडो गोरगरीब व गरजू जोडप्यांचे लग्न लावून देण्यात आलेले आहे. या विवाह सोहळ्यात लग्न करणाऱ्या जोडप्यांना विविध वस्तू जसेकि कपाट, पलंग, गादी, चादरी, टेबल, पंखा, मिक्सर, देवघर, भांडी, तसेच घरगुती कामाजाच्या विविध वस्तू मोठ्या प्रमाणावर दिल्या जाणार आहेत.

# आज सर्वात मोठ्या ध्वजाचे ध्वजारोहण

## सचिन दोडके मित्रपरिवार व आदित्य गार्डन सिटी सोसायटीचा उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय सण म्हटलं की आपल्या सर्वांची छाती अभिमानाने फुलून जाते. सर्वांना तिरंगी ध्वजाचे आकर्षण कायमच आपल्या नसानसामध्ये भिडलेले असते. सर्वसामान्यासाठी"झेंडा फडकवणे" हा एक दुर्मिळच क्षण. मात्र सर्वात उंच ध्वजाचा ध्वजारोहण करण्याचा यावर्षी "कॉमन मॅन वारजेकरांना" मिळणार आहे.

मा. नगरसेवक सचिन दोडके मित्रपरिवार व आदित्य गार्डन सिटी सोसायटी यांच्या सौजन्याने भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त लक्षवेधी ध्वजारोहण सोहळा 26 जानेवारी 2025 रोजी सकाळी नऊ वाजता होणार आहे.



यावेळी उपस्थित नागरिकांपैकी एकाकडून ह्या तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येणार आहे. या ठिकाणी उपस्थित उपस्थित नागरिकांच्या नावाची चिठ्ठी बॉक्स मध्ये टाकण्यात येणार आहे. त्यातून लकी ड्रॉ प्रमाणे एक चिठ्ठी काढून उपस्थित नागरिकांस या 45 मीटर विशाल ध्वजाचे ध्वजारोहण करण्याचा मान मिळणार आहे.

वारजे माळेवाडी परिसरा सह इतर परिसरातील नागरिक, विद्यार्थी व अनेक मान्यवर या उपक्रमासाठी उपस्थित राहत असतात.यंदा हे उपक्रमाचे चौथे वर्ष आहे.

मा.नगरसेवक सचिन दोडके व त्यांचे बंधू संजय(बाबू) दोडके यांच्या प्रयत्नातून साकार असलेल्या ह्या तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण हे सर्वात लक्षवेधी असते.

यामुळे नागरिकांमध्ये या ध्वजारोहणाची उत्सुकताही लागून राहिली आहे. सर्वांनी या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त होणाऱ्या ध्वजारोहणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# समर्थ सहकारी मॉडेलची गरज : रामदास आठवले

## ईएसजी कॉन्क्लेव्ह २०२५ मध्ये केंद्रीय सामाजिक न्यायमंत्र्यांचे प्रतिपादन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इ. स. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र व्हायचे असेल तर प्रगती साधण्यासाठी एक मजबूत सहकारी मॉडेल आवश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाचे राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शुक्रवारी केले. या दृष्टीने देशात ५०० सहकारी स्टार्टअप्स, कॅम्पस कोऑपरेटिव्ह्ज, सहकारी कमोडिटीज एक्सचेंज आणि सहकारी आर्थिक क्षेत्रे स्थापन करण्यासह अनेक महत्त्वाकांक्षी उपक्रमांची रूपरेषा आठवले यांनी मांडली.



पुण्यातील श्री बालाजी विद्यापीठाच्या सहकार्याने वर्ल्ड कोऑपरेशन इकॉनॉमिक फोरमने आयोजित केलेल्या ग्लोबल ईएसजी कॉन्क्लेव्ह २०२५ मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आठवले यांचे मुख्य भाषण झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इफ्कोचे अध्यक्ष आणि राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष श्री. दिलीप संघानी तसेच वर्ल्ड कोऑपरेशन इकॉनॉमिक फोरमचे सह-संस्थापक श्री. विनोद आनंद उपस्थित होते.

"आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्षापर्यंत पूर्णपणे विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न आपण बाळगले आहे. त्यासाठी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक समुदाय आणि प्रत्येक क्षेत्राने स्वतःच्या पूर्ण क्षमतेचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे महत्त्वाकांक्षी ध्येय साध्य करण्यासाठी सहकार क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे," असे श्री. आठवले म्हणाले.

देशातील आकांक्षी जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या ५०० सहकारी स्टार्टअप्सची स्थापना करावी, हे स्टार्टअप्स स्थानिक संसाधने, कौशल्ये आणि कल्पनांचा वापर करून प्रादेशिक आव्हानांना तोंड देतील आणि आर्थिक संधी निर्माण करतील. तंत्रज्ञान, डिजिटल सेवा, शाश्वतता आणि हरित उर्जेमध्ये नवोपक्रमांना चालना देण्यासाठी कॅम्पसमध्ये ५०० युवा-केंद्रित कॅम्पस सहकारी संस्था स्थापन कराव्यात. यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रम सुरू करता येतील. शेतकरी आणि लहान उत्पादकांना सक्षम बनवण्याच्या उद्देशाने सहकारी वस्तू एक्सचेंजची स्थापना करावी, हे एक्सचेंज पारदर्शक व्यापार, वाजवी किंमत आणि समान लाभाची हमी देतील. सहकारी आर्थिक क्षेत्रांची स्थापना करावी, ही क्षेत्रे शाश्वत विकास आणि समावेशक वाढ, नोकरीच्या संधी निर्माण करणे आणि ग्रामीण-शहरी एकात्मता वाढविण्यावर लक्ष केंद्रित करतील, असे काही प्रमुख प्रस्ताव यावेळी मांडण्यात आले.

यावेळी बोलताना श्री. दिलीप संघानी यांनी हवामान बदलासारख्या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी सहकारी यंत्रणेच्या गरजेवर भर दिला. श्री. विनोद आनंद यांनी नेतृत्व आणि शाश्वततेच्या दृष्टीने तरुणांना तयार करण्यासाठी ईएसजी तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले. जागतिक ईएसजी कॉन्क्लेव्हमध्ये आर्थिक विकासासोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या सामाजिक आणि बंधुभाव अर्थव्यवस्था (एसएसई) तयार करण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी (एसडीजी), विशेषतः एसडीजी १० (असमानता कमी करणे) योगदान देणाऱ्या नाविन्यपूर्ण सहकारी-नेतृत्वाखालील दृष्टिकोनांना प्रोत्साहन देऊन जागतिक सहकार्य आर्थिक मंच या उपक्रमाला पाठिंबा देत आहे.

# एथर एनर्जी तर्फे ग्राहकांसाठी बहु-भाषिक डॅशबोर्ड सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एथर एनर्जी लिमिटेड या भारतातील इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांनी आपल्या रिझ्टा या फॅमिली-स्कूटरमध्ये एक बहु-भाषिक डॅशबोर्ड इंटरफेस सादर केला आहे. या स्कूटरचा डॅशबोर्ड आता हिंदी, मराठी, गुजराती, बंगाली, तमिळ, तेलुगू, मल्याळी आणि कानडी या ८ प्रादेशिक भाषांना समर्थन देईल. त्यामुळे अधिक व्यापक ग्राहकवर्गासाठी हा डॅशबोर्ड अधिक सोयिस्कर होऊन चालकांचा गाडी चालवण्याचा अनुभव आणखी सुधारेल. यामध्ये अगोदर हिंदी डॅशबोर्ड लॉन्च होईल आणि त्या पाठोपाठ इतर प्रादेशिक भाषांमध्ये डॅशबोर्डची सुविधा प्राप्त होईल.

आय ए एम ए आय आणि कांतारच्या इंटरनेट इन इंडिया २०२४रिपोर्ट अनुसार, २०२४ मध्ये ९८ टक्के इंटरनेट यूझर्सनी भारतीय भाषांमध्ये कंटेंट ॲक्सेस केला. भारतीय सामान्यतः आपल्या प्रादेशिक भाषेतील डिजिटल कंटेंट पसंत करतात, मग ते लेख वाचणे असो, व्हिडिओ बघणे असो किंवा माहिती गोळा करणे असो. आपल्या भाषेतील कंटेंट त्यांना अधिक सोयिस्कर आणि परिचित वाटतो. याची दखल घेऊन एथरने वेगवेगळ्या भाषांमध्ये डॅशबोर्ड विकसित करून तो आपल्या ग्राहकांसाठी सादर करण्यावर काम केले. एथर एनर्जीचे चीफ बिझनेस ऑफिसर श्री. रवनीत सिंह फोकेला म्हणाले, "आम्ही सुरुवातीपासूनच भारतीय ग्राहकांचा विचार मनात ठेवून आमची टेक्नॉलॉजी आणि उत्पादने डिझाईन केली आहेत. आमचा उद्देश नेहमी यूझरला दर्जेदार अनुभव प्रदान करण्याचा असतो, यामुळेच आमच्या स्कूटर आकर्षक वाटतात. भारतातील समृद्ध विविधता आणि आपापल्या प्रादेशिक भाषेविषयी लोकांना वाटणारा अभिमान लक्षात घेऊन आमच्या स्कूटर्स अधिक यूझर-फ्रेंडली बनवण्याचा आमचा उद्देश होता. आम्हाला विश्वास वाटतो की, बहु-भाषिक डॅशबोर्डमुळे चालक आपली स्कूटर आपल्या पसंतीच्या भाषेत पर्सनलाईझ करू शकतील." वर्तमान आणि नवीन रिझ्टा झेड मालकांना एथरस्टॅक टीएम च्या ओव्हर-द-एअर सॉफ्टवेअर अपडेटच्या रूपात हा बहु-भाषिक डॅशबोर्ड प्राप्त होईल. एथरचे एथरस्टॅक टीएम हे सॉफ्टवेअर इंजिन याच कंपनीत बनवले जाते आणि ते एथर स्कूटर्सच्या सर्व अनुभवांना ताकद प्रदान करते.

# महेश मांजरेकर दिग्दर्शित 'एक राधा एक मीरा'चा ट्रेलर प्रदर्शित

- **अविनाश आहाले निर्मित चित्रपटात गश्मीर महाजनी, मृण्मयी देशपांडे, सुरभी भोसले, संदीप पाठक, आरोह वेलणकर, मेधा मांजरेकर आदींच्या भूमिका,**
- **'एक राधा एक मीरा' ७ फेब्रुवारी रोजी होणार प्रदर्शित**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महेश मांजरेकरदिग्दर्शित स्लॉव्हेनियामध्ये चित्रित झालेला पहिला मराठी चित्रपट म्हणून रसिक ज्याची आतुरतेने वाट पाहत आहेत अशा 'एक राधा एक मीरा'चा ट्रेलर आज प्रदर्शित करण्यात आला. मराठीतील एक बऱ्याच दिवसांनी आलेली म्युझिकल लव्हस्टोरी म्हणूनही चित्रपटाची उत्कंठा लागून राहिली असून तो ७ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रदर्शित होत आहे.

अत्यंत दिमाखदार अशा सोहळ्यात ट्रेलरचे प्रकाशन आज करण्यात आले. यावेळी महेश मांजरेकर, निर्माते अविनाशकुमार प्रभाकर आहाले कलाकार गश्मीर महाजनी, मृण्मयी देशपांडे, सुरभी भोसले, संदीप पाठक, तसेच तंत्रज्ञ उपस्थित होते.

अडीच मिनटांच्या या ट्रेलरमधून चित्रपटाचा पोत समोर येतो. ही एक म्युझिकल लव्ह स्टोरी असली तर तिला अनेक पदर आहेत, आणि ते प्रेम, दुःख, विनोद, भावना यांनी बहरलेले आहेत, हे ध्यानात येते. त्यातील संवाद आणि गाणी चित्रपटाबद्दल उत्कंठा वाढवतात."मी प्रेमात पडलीय, तो समोर दिसला, त्याचा आवाज ऐकू आला, कोणी त्याचे नाव घेतले तरी त्रास होतो.." "तुला वाटते तसे काहीच नाही..." "मग कसे आहे...?""काही गोष्टी समोरासमोर बोलाव्या लागतात..."

"तू सतत आसपास हवीशी वाटतेस मला. यालाच प्रेम म्हणता असतील तर मेबी आय एम इन लव्ह विथ यु...""आतून बुडबुडे आल्यासारखे होते..." अशा खिळवून ठेवणाऱ्या संवादांनी ट्रेलर पुढे सरकार जातो. पार्श्वभूमीवर "ओढ तुझी लागे अनिवार, जरा जरा मी झुरते...." अशी सुमधुर गाणी ऐकू येतात आणि चित्रपटाचा बाज उलगडत जातो. प्रेमभरे संवाद ट्रेलरमधून येत असतानाच आणि ही लव्ह स्टोरी आकाराला येत असतानाच काहीतरी दुःखद घडल्याची चाहूल लागते. "ट्रॅजेडीवाली लव्ह स्टोरी आहे तूझी..." असे संवाद समोर येतात.

अत्यंत ग्लॅमरस आणि हटके अशा या चित्रपटात सोनू निगम, शाल्मली खोलगाडे, सुखविंदर सिंग यांसारख्या दिग्गज गायकांच्या फौजेने चित्रपटाचे पार्श्वगायन केले आहे. सध्याचा आघाडीचा गायक विशाल मिश्रा यांनी या चित्रपटाचे संगीत दिले आहे.

आहालेज प्रॉडक्शनची निर्मिती असलेला हा चित्रपट स्लॉव्हेनीया येथे चित्रित होणारा पहिला मराठी चित्रपट आहे. अत्यंत नैसर्गिक व अभूतपूर्व अशी दृश्ये चित्रपटाबद्दलची उत्कंठा वाढवतात. त्यात छान छान, सुंदर व भावणारे चेहरे हे या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे, हे त्या ट्रेलरवरून अधोरेखित होते. खिळवून ठेवणारे संवाद, संगीताची अचूक फोडणी अशी ही एक कलाकृती आहे, याची खुणगाठ या ट्रेलरवरून बांधता येते. "मराठीत एक वेगळा प्रयोग या माध्यमातून आम्ही केला आहे. ही एक म्युझिकल लव्ह स्टोरी आहे. आजचे ग्लॅमरस चेहरे यात आहेत. उत्तम गीते आणि उत्तम संगीत चित्रपटाला आहे.

. आज प्रदर्शित झालेला ट्रेलर रसिकांची चित्रपटाबद्दलची उत्कंठा वाढवेल," असे उद्गार महेश मांजरेकर यांनी काढले आहेत.



2025 चा अर्थसंकल्प जवळ आला आहे. हे लक्षात घेऊन, रिलायन्स जनरल इन्शुरन्सचे सीईओ श्री राकेश जैन यांनी त्यांची 2025 वर्षाची बजेट इच्छा यादी लिहिली आहे. “आम्ही केंद्रीय अर्थसंकल्प 2025 ची वाट पाहत आहोत, सामान्य विमा उद्योग संपूर्ण भारतातील विमा प्रवेशाला चालना देणाऱ्या धोरणात्मक उपक्रमांची आतुरतेने वाट पाहत आहे. ज्यामुळे संपूर्ण भारतातील विमा प्रवेशाला चालना मिळेल. कलम 80C आणि 80D अंतर्गत सरकारने विमा प्रीमियमसाठी कर सवलती लागू करण्याची आम्हाला अपेक्षा आहे, हे घर आणि मोटार विम्यासाठी स्वतंत्र कर कपात देखील प्रदान करेल. विमा उत्पादनांवरील जीएसटी दर तर्कसंगत केल्याने विमा उत्पादने परवडणारी असतील आणि सहज उपलब्ध होतील. श्री राकेश जैन, सीईओ, रिलायन्स जनरल इन्शुरन्स आम्ही डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, एसएमई, कृषी आणि इतर सेवा कमी असलेल्या क्षेत्रांसाठी नाविन्यपूर्ण विमा उपाय सुलभ करण्यासाठी गुंतवणूक करण्याची अपेक्षा करतो. अशा उपक्रमांमुळे केवळ उद्योगाच्या वाढीला चालना मिळणार नाही तर भारताच्या आर्थिक लवचिकतेतही महत्त्वपूर्ण योगदान मिळेल. विमा दत्तक घेण्यास प्रोत्साहन देऊन, सरकार अधिक सुरक्षित आणि स्थिर भविष्याची खात्री करून, जोखीम कमी करण्यासाठी नागरिकांना सक्षम करू शकते. आम्ही अशा अर्थसंकल्पाची आतुरतेने वाट पाहत आहोत जो विमा प्रवेश आणि नावीन्यपूर्णतेला प्राधान्य देईल, ज्यामुळे सर्वांचा विकास होईल.” - श्री राकेश जैन, सीईओ, रिलायन्स जनरल इन्शुरन्स

# पुण्याचे महापौरपद आरपीआयला मिळावे - आठवले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका असल्याने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लांबल्या आहेत. येत्या एप्रिल किंवा मे महिन्यात या निवडणुका पार पडतील अशी शक्यता आहे. पुणे महापालिका निवडणुकीत मागच्या वेळी आम्हाला 5 जागा मिळाल्या होत्या. आता महायुती असली तरी यंदाच्या महापालिका निवडणुकीत कोणकोण भाजप सोबत राहतील यात शंका आहे. मात्र आरपीआय हा भाजपचा मूळ मित्रपक्ष असल्याने आम्ही पालिका निवडणुकीतही भाजप सोबतच राहणार आहोत. तसेच महापौर पद अनुसूचीत जातीसाठी आरक्षित असल्यास ते आरपीयआय ला मिळावे, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.



व्हीआयपी सर्किट हाऊस येथे आयोजित पत्रकार परिषदेत रामदास आठवले बोलत होते. यावेळी आरपीआयचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, प्रदेश संघटक परशुराम वाडेकर, महेंद्र कांबळे, शैलेश चव्हाण, विरेन साठे, श्याम सदाफुले, महिपाल वाघमारे, अशोक शिरोळे, मोहन जगताप, विशाल शेवाळे, उमेश कांबळे यांच्यासह आरपीआयचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

पुढे बोलताना आठवले म्हणाले, पुणे शहरात जागोजागी आमच्या शाखा आहेत. त्यामुळे भाजप ने जरी स्वबळाचा नारा दिला तरी त्यांना पुणे महापालिका निवडणुका जिंकण्यासाठी आमच्या शिवाय त्यांना पर्याय नाही. त्यामुळे आम्ही पालिका निवडणुकीतही भाजप सोबतच राहणार आहोत. तसेच महायुती मध्ये रायगड आणि नाशिक पालकमंत्री पदावरून वाद सुरू असले तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा प्रश्न मार्गी लावतील असे सांगत, राज्य मंत्रिमंडळात जी एक जागा रिक्त आहे त्याजागेवर आरपीआय ला मंत्रिपद द्यावे अशी मागणीही आठवले यांनी केली.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकार देशमुख कुटुंबाला न्याय देण्यासाठी प्रयत्नशील आहे. या प्रकरणाशी संबंधित घटनेत वाल्मीक कराडवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र सर्व घटनांचा तपशील बघितलं तर देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींचा संबंध कराडशी असल्याने त्यांच्यावर फक्त खंडणी नाही तर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी रामदास आठवले यांनी केली आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या वतीने आज भीमा कोरेगाव विजय स्तंभ जागे संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी स्मारकासाठी 150 एकर जागा सरकार देणार आहे, त्यातील साडे 9 एकर जागेवर असलेले अतिक्रमण हटवावे, या स्मारकांच्या नियोजित आराखाडयासाठी राज्य सारकराणे तत्काल 10 कोटी रुपयांचा निधी द्यावा अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आल्याचेही रामदास आठवले यांनी सांगितले. निवडून आलेल्या अनेक उमेदवारांचे पद जात वैधता प्रमाणपत्र जमा न केल्याने रद्द केले जाते. याकडे रामदास आठवले यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, आरक्षित जागेवर उमेदवार देताना पक्षांनी विचार केला पाहिजे. उमेदवारी देतानाच त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र आहे की नाही यांची खातरजमा करूनच त्यांना पक्षाने उमेदवारी अर्ज दिला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

## थोडक्यात



### नागराज मंजुळे यांच्या हस्ते 'स ला ते स ला ना ते' चित्रपटाचा ट्रेलर लॉँच

पुणे (आरंभ पर्व) : कमी श्रमात आणि कमी काळात अधिक पैसा कमावण्याची आकांक्षा असलेला बडबडा तरुण आणि त्याच्या आयुष्यात येणाऱ्या अबोल तरुणीच्या नात्याचं व्याकरण सांगणारी कथा म्हणजे स ला ते स ला ना ते हा चित्रपट आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच सुप्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते पुणे येथे लॉँच करण्यात आला असून दमदार स्टारकास्ट असलेल्या ट्रेलरने चित्रपटाविषयीचे कुतूहल आता आणखी वाढवले आहे. अतिशय बडबड करणारा, गोडबोलू तरुणाची ओळख अचानक एका पर्यावरणप्रेमी तरुणीसोबत होते. या मैत्रीचे रूपांतर हे प्रेमात होते आणि गोष्टी थेट लग्नापर्यंत पोहचतात. हा तरुण विदर्भातील चंद्रपूरमधील न्यूज चॅनेलचा पत्रकार असतो. पर्यावरणप्रेमी तरुणी आणि या तरुण पत्रकाराच्या नात्याच्या व्याकरणाची गोष्ट या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. पत्रकारिता, पर्यावरणाचे प्रश्न, विकास असे मुद्देही या चित्रपटातून हाताळण्यात आले आहेत. पत्रकार होऊ इच्छिणाऱ्या तरुणाला पत्रकारितेच्या माध्यमातून लवकर श्रीमंत होण्याची चटक लागते. त्यासाठी तो अनेक जुगाड करू लागतो. अशाच एका जुगाडात तो कसा अडकत जातो आणि त्याच्यावर काय आपत्ती ओढवते, असं या चित्रपटाचं कथानक असल्याचं ट्रेलरवरून जाणवतं.

### होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाने ॲक्टिवा केली लॉँच

पुणे (आरंभ पर्व) : होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया (HMSI) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय स्कूटर ॲक्टिवाचा नवीन OBD2B-अनुरूप मॉडेल सादर केला, जो तंत्रज्ञान, सोय आणि टिकाऊपणाच्या नवीन पातळीवर घेऊन जातो. अत्याधुनिक फीचर्सनी सज्ज हा नवीन ॲक्टिवा ग्राहकांच्या बदलत्या गरजांना ध्यानात घेऊन डिझाइन करण्यात आला आहे. नवीन 2025 होंडा ॲक्टिवाची किंमत 80,950 रुपये (एक्स-शोरूम दिल्ली) पासून सुरू होते. नवीन ॲक्टिवाची ओळख करून देताना, होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, अध्यक्ष आणि सीईओ श्री. त्सुत्सुमू ओटानी म्हणाले, “भारतीय ग्राहकांसाठी मोबिलिटीचे पुनरुत्थान करण्यासाठी ॲक्टिवा नेहमीच आघाडीवर राहिला आहे. आपल्या नवीन 2025 आवृत्तीसह, हे नावीन्य, सोय आणि विश्वासार्हतेचा परिपूर्ण समतोल दर्शवतो, ज्यामुळे हे भारतातील सर्वात जास्त पसंतीचे स्कूटर बनले आहे.

## आयशर ट्रक्स आणि बसेसने लॉँच केली आयशर प्रो एक्स रेंज

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

वीई कमर्शियल व्हीकल्सच्या व्यावसायिक युनिट आयशर ट्रक्स आणि बसेसने आपल्या इलेक्ट्रिक फर्स्ट छोट्या व्यावसायिक वाहनांची (एससीवी) आयशर प्रो एक्स रेंज भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपो 2025 मध्ये लॉँच केली. कंपनीची ही नवीनतम रेंज, 2 ते 3.5 टन सेगमेंटमध्ये, आयशरचा भरीव प्रवेश आहे, जो अंतिम कडीच्या परिवहनाच्या गरजांना पूर्ण करण्यास आणि त्याला चालना देण्यास आयशरच्या ध्येयाला प्रतिबिंबित करतो. या प्रसंगी, वीई कमर्शियल व्हीकल्स लिमिटेडचे एमडी आणि सीईओ श्री विनोद अग्रवाल म्हणाले, “आम्ही नेहमीच उद्योगांना नवकल्पनांनी परिपूर्ण उत्तम उपाय देण्याची परंपरा पुढे नेली आहे आणि लाइट व मीडियम ड्यूटी ट्रक्समध्ये मजबूत पकड असलेल्या आपल्या वारशाचा फायदा घेत या नवीन श्रेणीचे निर्माण केले आहे. आमच्या ग्राहकांसोबत त्यांची गरज लक्षात घेऊन तयार केलेली आयशर प्रो एक्स, छोटे व्यावसायिक वाहन क्षेत्रात एक नवा आदर्श स्थापित करेल. हे आमच्या मूलभूत तत्त्व 'नवीन विचार, नवीन मार्ग' चे मूर्त रूप आहे. आपल्या देशाच्या 'विकसित भारत'च्या या प्रवासात एससीवी सेगमेंटचा महत्त्वपूर्ण सहभाग असेल आणि आयशर प्रो एक्स अंतिम कडीच्या लॉजिस्टिक्स क्षेत्रात क्रांती आणणारा ठरेल." आयशर प्रो एक्समध्ये त्याच्या श्रेणीतील काही सर्वोत्तम वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत ज्यात: सर्वात मोठी कार्गो जागा: 2-3.5 टन जीव्हीडब्ल्यू रेंजसह या प्रकारातील वाहनांमध्ये सर्वाधिक कार्गो क्षमता. ऊर्जा बचतीचा नवीन युग: एकाच चार्जमध्ये इतर वाहनांपेक्षा जास्त रेंज, जास्तीत जास्त प्रवासांची गॅरंटी.

## प्रजासत्ताकदिनी मेट्रोची पुणेकरांना खास भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पुणेकरांसाठी आता मेट्रोकडून खास एक तास अधिक सेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. २६ जानेवारीपासून मेट्रो रात्री १० ऐवजी ११ वाजेपर्यंत धावणार आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे.



मेट्रोला लोकांचा वाढता वापर आणि प्रवाशांच्या आग्रहास्तव प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत पुणे मेट्रोने आपल्या प्रवासी सेवेत वाढ करण्याचा निर्णय घेतला. सध्या दोन्ही मर्गिकांवरील पुणे मेट्रोची प्रवासी सेवा सकाळी ६ ते रात्री 10 अशी आहे. तर आता 26 जानेवारी 2025 पासून या सेवेमध्ये एक तासाची वाढ करून ही प्रवासी सेवा रात्री 11 पर्यंत वाढवण्यात येत आहे. पुणे मेट्रोची वारंवारता गर्दीच्या वेळी (स. 8 ते 11 आणि संध्या. 4 ते 8) दर 7 मिनिटांनी व कमी गर्दीच्या वेळी (स. 6 ते स. 8, स. 11 ते दु. 4 आणि रा. 8 ते रा.10) दर 10 मिनिटांनी आहे. आता रात्री 10 ते 11 या वाढलेल्या वेळेमध्ये मेट्रोची वारंवारता दर 15 मिनिटांनी असणार आहे. पुणे मेट्रोच्या प्रवाशांमध्ये मेट्रो कार्डचा वाढता वापर लक्षात घेऊन प्रजासत्ताक दिनानिमित्त पुणे मेट्रो 26 जानेवारी 2025 रोजी एक पुणे ट्रान्झिट कार्ड फक्त 20 रुपयांना उपलब्ध करून देत आहे. या दिवशी पहिली 5000 एक पुणे ट्रान्झिट कार्ड 20 रुपयांना मिळणार आहे.

या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी म्हणाले की, "सध्या पुणे मेट्रोचा वाढता वापर लक्षात घेऊन आणि प्रवाशांच्या आग्रहास्तव मेट्रोने आपल्या प्रवासी सेवेत वाढ केली आहे. रात्री कामावरून उशिरा घरी जाणाऱ्या नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

वेळेवर पोहचणार आणि सुरक्षित असा सार्वजनिक वाहतूक पर्याय यामुळे नागरिकांना उपलब्ध होणार आहे."

## अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ‘आर्या ओम्नीटॉक’ने घडवली क्रांती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

टेलीमॅटिक्स उद्योगात २०हून अधिक वर्षांचा अनुभव असलेल्या आर्या ओम्नीटॉकने आपले आघाडीचे स्थान कायम राखले आहे. लॉजिस्टिक्स आणि मालवाहतूक क्षेत्रात आयओटी आणि जीपीएसचा वापर वाढला असून त्यामध्ये या क्षेत्राला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. साहजिकच ‘आर्याओम्नीटॉक’सारखी विश्वासार्ह जीपीएस सोल्यूशन पुरविणारी कंपनी एकमेव ठरत आहे. लॉजिस्टिक्स, घातक रसायनांची व नाशवंत अन्नपदार्थांची वाहतूक, कर्मचारी वाहतूक, कोणत्याही मालाचे कार्यक्षम वितरण अशा प्रत्येक क्षेत्रात ‘आर्या ओम्नीटॉक’च्या जीपीएस ट्रॅकिंग डिव्हाइस आणि ‘फ्लीट विझिल’ या एसएएएस-आधारित प्लॅटफॉर्मद्वारे पारंपरिक ट्रॅकिंगच्या पलीकडे जाऊन काम केले जाते. कंपनीची ही सोल्युशन्स फ्लीट ऑपरेशन्स ऑप्टिमाइझ करण्यासाठी, सुरक्षेत सुधारणा करण्यासाठी आणि ग्राहकांना अधिक परतावा देण्यासाठी तयार करण्यात आलेली आहेत. वाहनांमध्ये एआयएस १४० जीपीएस ट्रॅकिंग डिव्हाइस बसविल्यामुळे भारतातील वाहतूक आणि रस्ते सुरक्षेच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन घडून येत आहे. या उपकरणांबाबत खुद्द केंद्र सरकारनेच आदेश दिलेला असल्याने व्यावसायिक वाहनांच्या कार्यप्रणालीत सुधारणा घडवून येत असून सुरक्षेच्या उच्च मानकांची अंमलबजावणी करण्यात आणि एकंदर वाहतूक कार्यक्षमता सुधारण्यात हा आदेश क्रांतिकारक ठरणार आहे. आर्या ओम्नीटॉक ही या क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून ती एआयएस १४० मानकांशी सुसंगत अशी अत्याधुनिक सोल्युशन्स पुरविते. ही सोल्युशन्स फ्लीट ऑपरेटर आणि वाहतूक प्राधिकरणांना त्यांच्या कामात सुसूत्रता आणण्यास मदत करतात. सार्वजनिक सुरक्षेला यात प्राधान्य देण्यात आलेले आहे. यातील रिअल-टाइम ट्रॅकिंग आणि चालकाच्या वर्तनाचे विश्लेषण या वैशिष्ट्यांमुळे अपघात कमी होण्यास मदत होते आणि चालक व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ते महत्वाचे ठरते.

## एनएचसी फूड्स लिमिटेडने निव्वळ नफ्यात 384% वाढ नोंदवली

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

एनएचसी फुड्स लिमिटेड विविध कृषी उत्पादने, कमोडिटी आणि मसाल्यांच्या प्रमुख निर्यातदाराने 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीचे आणि नऊ महिन्यांचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाहीत, कंपनीचा PAT 384% वाढून रु. 208.33 लाख रुपये नोंदवला आहे, जो मागच्या वर्षी ह्या कालावधीत 43.03 लाख होता. 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या तिमाहीतील कामकाजातील आवक 58% वाढून 7352.97 लाख नोंदवली, जी गेल्या वर्षी ह्या कालावधीत 4649.69 लाख होती. 31 डिसेंबर 2024 रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी, कंपनीचा PAT 384% ने वाढून 614.30 लाख पहोंचाला आहे, जो गेल्या वर्षी ह्या कालावधीत 126.88 लाख होता.

# पुष्प प्रदर्शनाची परंपरा युवकांनी जपावी : सुहास दिवसे

## एम्प्रेस गार्डनमध्ये पुष्प प्रदर्शन नागरिकांसाठी खुले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एम्प्रेस गार्डन येथील पुष्प प्रदर्शनाचा हा वारसा आजच्या युवकांनी देखील जपावा. पुण्याला लाभलेला हा वारसा आहे तो आपण जपलाच पाहिजे असे मत पुण्याचे कमिशनर आणि डायरेक्ट ऑफ लॅंड रेकॉर्डसचे डॉ. सुहास दिवसे यांनी व्यक्त केले.

एम्प्रेस गार्डन फ्लॉवर शो 2025 प्रदर्शनाच्या उदघाटना प्रसंगी ते बोलत होते. यावेळी द ॲग्री - हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया प्रेसिडेंट प्रताप पवार, संस्थेचे मानद सचिव सुरेश पिंगळे, विश्वस्त अनुपमा बर्वे, सुमन किलोस्कर, डॉ श्रीनाथ कवडे, बाळासाहेब शिवरकर, प्रशांत चव्हाण आदी उपस्थित होते.

सुहास दिवसे म्हणाले, "संपूर्ण महाराषरात हा मोठा इव्हेंट आहे. हा इव्हेंट एक सणा सारखा साजरा होतो. उदघटना पूर्वीच इथे पुणेकरांनी प्रचंड गर्दी केली आहे. हा पुण्याला मिळालेला वारसा आहे जो पुढे ही असाच चालू रहावा. प्रतापराव पवार, सुमन किर्लोस्कर या जेष्ठनी अधिरात प्रयत्न करून ही परंपरा जपली आहे.

आता अनेक युवकांनी ही परंपरा जपण्याचे हाती घेतले आहे ते पुढे असेच यशस्वी होतील. या 3 दिवस चालणाऱ्या इव्हेंट मध्ये अनेक वेगवेगळे फुल झाडी, नवीन तंत्रज्ञान वापरून अनेक वृक्षाची लागवड केली आहे ते ही तुम्हाला पाहायला मिळतील. तर सर्व पुणेकऱ्यांना आवाहन आहे या प्रदर्शनाला नक्की भेट द्या."

ॲग्री हॉर्टीकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेमार्फत एम्प्रेस गार्डनचे व्यवस्थापन केले जाते. बागेचे व्यवस्थापन करीत असताना संस्थेमार्फत नेहमी अनेक विविध समाजपयोगी उपक्रम बागेत राबविले जातात. ज्यायोगे सर्वसामान्य व्यक्तीला निसर्गाबद्दल व पर्यावरणाबद्दल आपुलकी निर्माण होईल व प्रत्येक व्यक्तीला त्यापासून काही विरंगुळा मिळेल.या उद्देशाने ॲग्री हॉर्टीकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया ही संस्था 1830 पासून कार्यरत आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये



संस्थेमार्फत एम्प्रेस गार्डन येथे पुष्प प्रदर्शनाचे आयोजन केले जाते.

सुरवातीच्या काळात पुष्प प्रदर्शन म्हणजे केवळ ठराविक वर्गाचा विरंगुळा मानला जात होते. मात्र संस्थेने कालानुरूप त्यामध्ये बदल केल्यामुळे आज जे पुष्प प्रदर्शन भरविले जाते त्यामध्ये अबाल- वृद्धांचा सहभाग असतो. सर्वसामान्यांचा पुष्पप्रदर्शनामध्ये अधिक सहभाग वाढविण्यासाठी बागप्रेमींसाठी निरनिराळ्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात. तसेच फुलांची कलात्मक मांडणी, भाजीपाला स्पर्धा, आकर्षक व शोभिवंत पानांच्या कुंड्या तयार करणे, इ. गोष्टींच्या स्पर्धा या निमिताने आयोजित करण्यात येतात. तसेच बागेतील विविध फुले देखील सर्वसामान्य व्यक्ती या प्रदर्शनामधील स्पर्धेत मांडू शकतात. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.केवळ स्पर्धे पुरते मर्यादित न राहता. पुष्प प्रदर्शनानिमित्ताने बागेस भेट देणाऱ्या पुष्प रसिकांना नव्याने सजलेल्या एम्प्रेस गार्डनचा देखील आनंद घेता येतो. पुष्प प्रदर्शनानिमित्त दरवर्षी बाग विविध प्रकारच्या उद्यान रचना, आकर्षक कुंड्यांची मांडणी, विविध पानाफुलांची रचनात्मक मांडणी करून आकर्षक रीत्या सजविण्यात येते. त्यामुळेच तर पुष्प रसिक या पुष्प सोहळ्याची वर्षभर आतुरतेने वाट पहात असतात. पुष्पप्रदर्शनाच्या निमित्ताने पुण्यातूनच नव्हे तर अगदी कोल्हापूर, सांगली, नाशिक, आंध्र प्रदेश इ. ठिकाणाहून नर्सरी व्यावसायिक या पुष्पप्रदर्शना मध्ये सहभागी होण्याकरिता येत असतात.प्रदर्शनाच्या निमित्ताने दरवर्षी खास मुलांसाठी चित्रकला व हस्ताक्षर लेखन स्पर्धा देखील आयोजित करण्यात येतात. यंदाच्या वर्षी देखील ही स्पर्धा भरवण्यात आली होती. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण दिनांक 27 रोजी सायंकाळी 5 वाजता करण्यात येणार आहे. या स्पर्धेस निरनिराळ्या शाळांमधून सुमारे 1000 ते 1200 विद्यार्थ्यांचा सहभाग होता .

या प्रदर्शनामध्ये मुख्य आकर्षण असते ते म्हणजे विविध प्रकारच्या पुष्परचना. यंदाच्या वर्षदिखील) जपानी पध्दतीने साकारलेल्या विविध पुष्परचना तसेच बोन्साय वृक्षांचे विविध प्रकार स्पर्धकांनी साकारलेल्या विविध कलाकृती, तसेच गुलाबाच्या अनेक प्रजाती देखील या प्रदर्शनात पुष्पप्रेमींच्या पसंतीस नक्कीच उतरतील. उदघाट्नच्या पहिल्याच दिवशी पुण्यसह इतर अनेक ठिकाण्याहून अनेक नागरिकांनी प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दी केली होती.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.